K. S. Wani Memorial Trust

NEWS LETTER

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.34 / July – September 2026 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

स्वर्गीय डॉ. जगन्नाथ वाणी यांची जयंती साजरी

१० सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. वाणी यांच्या जन्मदिवशी त्यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या स्मृतीस उजाळा देण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे, प्रशासन प्रमुख सौ वैशाली सोनगिरे व प्रतिष्ठानच्या सर्व प्रकल्पातील कर्मचारी वृंद उपस्थित होते.

प्रयागराज येथे आयोजित टी. प्रसाद मेमोरियल गोल्ड मेडल स्पर्धेत विद्यार्थी संघ सहभागी

प्रयाग राज येथे आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या टी. प्रसाद मेमोरियल गोल्ड मेडल या प्रिंटींग क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपल्या संस्थेमार्फत दोन विद्यार्थ्यांचा संघ निवड प्रक्रिया पूर्ण करून सहभागी करण्यात आला होता. त्यात द्वितीय वर्षाच्या केदार पाटील व वैभव पाटील यांनी सहभाग घेतला. स्पर्धे दरम्यान पहिला राऊंड यशस्वीरित्या पूर्ण केला. परंतु पुढील फेरीत संघ स्पर्धे बाहेर पडला. सहभागी विद्यार्थ्यांना आयोजकांकडून सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल संपन्न

द्वितीय वर्ष मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक शैक्षणिक सहल जळगाव येथे आयोजित करण्यात आली होती. सहली दरम्यान जळगाव येथील विविध उद्योग समूहास भेट देऊन माहिती देण्यात आली. त्यात प्रामुख्याने लोकमत न्युज पेपर्स लि. येथे वेब ऑफसेट तंत्रज्ञान, ओम् मल्टीप्लास्ट प्रा. लि. येथे ग्रॅव्हियर प्रिंटिंग तंत्रज्ञान तसेच अग्रवाल फ्लेक्झिबल पॅकेजिंग प्रा. लि. या समूहात फ्लेक्सोग्राफिक प्रिंटिंग तंत्रज्ञानाबाबत अद्यावत माहिती देण्यात आली व प्रत्यक्ष कार्यरत मशीन दाखवण्यात आले. ऑन जॉब डिमोन्स्ट्रेशन बघितल्यामुळे विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा झाला.

संस्थेतील कर्मचाऱ्यांनी घेतला पावसाळी सहलीचा आनंद

७ ऑगस्ट २०२६ रोजी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांची एक दिवसीय पावसाळी सहल आयोजित करण्यात आली होती . पिंपळनेर तालुक्यातील चिवटी बारी या निसर्गरम्य स्थळी आयोजित करण्यात आलेल्या सहली दरम्यान बारीपाडा येथील पद्मश्री पुरस्कार विजेते श्री. चैत्राम पवार यांच्या प्रकल्पास भेट देऊन माहिती घेण्यात आली. यावेळी श्री चैत्राम पवार यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला , तसेच आमळी येथील सुप्रसिद्ध श्री कन्हैयालाल महाराज यांच्या मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. चिवटी बारीचे विलोभनीय दृश्य पाहून कर्मचारी भारावून गेले. बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाचे कर्मचारी व संस्थेचे कर्मचारी सहलीत सहभागी झाले होते. रोजच्या जीवनात बदल घडवून सहभागी कर्मचाऱ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद घेतला.

विद्यार्थ्यांची यशोगाथा

योगेश पाटीलचा प्रेरणादायी प्रवास......

मी योगेश दिलीप पाटील, शिंदखेडा तालुक्यातील वरसुस हे माझे मूळ गाव. वडील शेतकरी आम्ही एकूण चार भावंडे दोन भाऊ दोन बहिणी घरची परिस्थिती सामान्य मध्यम वर्गीय.

बहिणी विवाहित आहेत, तर भाऊ इंडियन आर्मीत जॉब करतो . आई वडिलांना शेती कामात मदत करते. मी बारावी परीक्षा उत्तीर्ण झालो आणि धुळे येथील का.स. वाणी प्रिंटींग इन्स्टिट्यूटमधून डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. मला व्यावसायिक शिक्षण घेण्याची इच्छा होती व वडिलांनी पण होकार दिल्यानंतर मी धुळ्यात आलो. २०१२- २०१३ च्या बॅच मधून उत्तीर्ण झालो. नोकरीची सुरुवात मी मुंबईतून केली. हुतामाकी पी पी एल या कंपनीतून अनुभव घेऊन मी पारेख ॲग्रो,पुणे या कंपनीत आलो. सातत्याने शिकण्याची जिद्द आणि स्वतःला सिद्ध करण्याचे आव्हान स्वीकारत आज मी अंगोला, येथे ग्राफिक सिस्टम या साऊथ आफ्रिका येथील कंपनीत प्रिंटिंग एक्झिक्युटिव्ह या पदावर कार्यरत आहे.

मला सध्या १५०० USD इतके वेतन आहे माझा विवाह झाला असून पत्नी सौ वैशाली B.Sc. आहे. मला एक मुलगी आहे. मी माझ्या कुटुंबासह एकदम आनंदात आहे. माझ्या या प्रवासात माझ्या लहानगावाच्या संस्कारांचा आणि का.स.वाणी प्रिंटींग इन्स्टिट्यूटमधील शिक्षणाचा मोठा वाटा आहे. हा प्रवास म्हणजे जिद्द आणि अपार मेहनतीचे फळ आहे

अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन

अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेचे पुणे येथील पदाधिकारी डॉ. नितीन हांडे यांनी अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समाजात अंधश्रद्धेच्या आहारी गेल्यामुळे लोकांची होणारी फसवणूक कशा पद्धतीने होते याबाबत सविस्तर खुलासा करून प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रयोगांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा वैचारिक दृष्टिकोन विकसित करणे हाच होता. संस्थेत शिकत असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचा विशेष लाभ झाला. दोन्ही वर्गांचे मिळून सुमारे ७० ते ८० विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. का . स . वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी . ए. मा. श्री आप्पासाहेब शशिकांत धामणे यांनी देखील कार्यक्रमास भेट दिली व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. कार्यक्रम आयोजन करण्यासाठी संस्थेच्या प्रशासन प्रमुख सौ. वैशालीताई सोनगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



प्रथम वर्ष मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमास १०० टक्के प्रवेश

ऑगस्ट २०२६ अखेर मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रम वर्गांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ साठी प्रथम वर्षास ४४ तर द्वितीय वर्षास ४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. विद्यापीठाची मंजूर क्षमता ४० आहे. कोणत्याही जाहिरातीशिवाय प्रवेश क्षमतेच्या दहा टक्के अधिक प्रवेश करण्यास आपणास यश मिळाले आहे.

स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

यावर्षी १५ ऑगस्ट , देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन संस्थेचे विश्वस्त श्री श्रीपाल मुणोत यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन संपन्न करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे , व्यवस्थापक श्री गिरीश केले , संस्थेचे कर्मचारी तसेच बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाचे कर्मचारी पदाधिकारी व संस्थेचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची का. स. वाणी संस्थेला शैक्षणिक अभ्यास भेट

मोराणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालयाच्या बी. एस. डब्ल्यू. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दिनांक 23 जुलै 2026 रोजी नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत उपक्रमातून का स वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेतील नवनवीन उपक्रम जाणून घेण्यासाठी शैक्षणिक भेट दिली.

विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून व जनतेच्या हिताच्या दृष्टीने राबवल्या जाणाऱ्या प्रकल्प व उपक्रमांची माहिती जाणून घेतली. ग्रामीण भागात जाऊन शाळेतील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी बालनेत्र प्रकल्पाच्या माध्यमातून कशी केली जाते? का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान अंतर्गत रेऊ विज्ञान विहारा तर्फे कोणते उपक्रम राबविले जातात ? याविषयी विस्तृत माहिती जाणून घेतली. मुद्रण शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. प्रसाद पुराणिक यांनी संस्थेविषयी सविस्तर माहिती दिली. ग्रंथपाल श्री मिलिंद दीक्षित यांनी भारतीय मराठी अभ्यास परिषद व ग्रंथालयाविषयी विस्तृत माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले सोबत प्रा डॉ. दिलीप घोंगडे व प्रा. डॉ. सुवर्णा बरडे उपस्थित होते.

आगामी भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे नंदुरबार शहरात आयोजन

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे व श्री. काकासाहेब हिरालाल मदनलाल चौधरी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १८ व १९ डिसेंबर २०२६ (शुक्रवार व शनिवार) रोजी नंदुरबार येथे भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३६ वे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.



चर्चेसाठी 'साहित्यप्रवाहांचे बदलते स्वरूप' हा विषय निश्चित करण्यात आला असून विषयाचे बीजभाषण प्रा. डॉ.प्रल्हाद लुलेकर करणार आहेत. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर रवींद्र चौधरी असतील, कवी वाहरू सोनवणे यांच्या हस्ते उदघाटन होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून क.ब. चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.के.बी. पाटील, स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी.ए. शशिकांत धामणे, परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. यशवंत मनोहर सचिव प्रा. डॉ. शोभा शिंदे, संचालक प्रा. डॉ वंदना महाजन आदी मान्यवर उपस्थित असतील. परिषदेला महाराष्ट्रातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांचा संशोधक विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

संस्थेच्या उत्पादन विभागात गणेशोत्सवाचे आयोजन

दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील संस्थेच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या उत्पादन विभागात गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संगणक विभागाचे कर्मचारी श्री राजेंद्र टोणपे यांच्या हस्ते श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व विधिवत पूजन करण्यात आले. तसेच उत्सवा दरम्यान संस्थेच्या महिला कर्मचारी सौ कल्पना बाविस्कर व त्यांचे पती श्री. सतिश बाविस्कर यांच्या हस्ते श्री सत्यनारायणाची महापूजा संपन्न झाली. संपूर्ण सप्ताह आनंदात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

रेऊ वाणी विज्ञान विहार

रेऊ वाणी विज्ञान विहाराला मराठी मंडळ स्थापनेच्या प्रकल्पासाठी शासनाची मान्यता

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाकडून का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान, धुळे संचालित रेऊ वाणी विज्ञान विहाराला १०० शाळांमध्ये मराठी मंडळ स्थापन करण्याच्या प्रकल्पासाठी दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी मान्यता मिळाली, ही संस्थेसाठी गौरवाची बाब आहे. या प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

मराठी मंडळा अंतर्गत तज्ज्ञांचे मार्गदर्शन : विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध भारतीय संस्कृतीची, संत साहित्याची आणि मराठी साहित्यविश्वाची ओळख व्हावी, या उद्देशाने मराठी मंडळाच्या वतीने विविध विषयांवर मार्गदर्शनाची व्याख्याने आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान न देता भारतीय ज्ञानपरंपरा, साहित्य, संस्कृती, जीवनमूल्ये आणि आदर्श व्यक्तिमत्त्वांची ओळख करून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

व्याख्यान पहिले : 'ओळख संत साहित्याची' — भारतीय संस्कृतीचा ज्ञानप्रवास

दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी मराठी मंडळाच्या उपक्रमाचे पहिले पुष्प गुंफण्यात आले. डॉ. मंदार म्हस्कर सर यांनी 'ओळख संत साहित्याची' या उपक्रमांतर्गत 'वेदापासून संतसाहित्यापर्यंत : भारतीय संस्कृतीचा ज्ञानप्रवास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

भारतीय संस्कृतीची जडणघडण आणि तिच्या ज्ञानपरंपरेचा विकास यांचा मागोवा घेताना त्यांनी वेद, वेदांग, उपनिषदे, पुराणे आणि संत साहित्य यांमधून विकसित झालेल्या भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या ज्ञानपरंपरेमुळे मानवी जीवन अधिक समृद्ध, विवेकी आणि मूल्याधिष्ठित होण्यास मदत झाली असे त्यांनी प्रतिपादन केले. भारतीय संस्कृतीने आपल्याला दिलेल्या धैर्य, क्षमा, इंद्रियनिग्रह, विवेक, सत्य आणि अक्रोध या जीवनमूल्यांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. ही मूल्ये केवळ ग्रंथांमध्ये वाचण्यासाठी नसून, दैनंदिन जीवनात आचरणात आणण्यासाठी आहेत असे सांगितले. भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास केल्याने आपल्याला आपली संस्कृती समजते. त्याचबरोबर वर्तमान जीवनाकडे पाहण्याची योग्य दृष्टी प्राप्त होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या समृद्ध भारतीय ज्ञानपरंपरेचा जाणीवपूर्वक अभ्यास करावा, असे आवाहन डॉ. म्हस्कर यांनी केले.

डॉ. मंदार म्हसकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

व्याख्यान दुसरे : मराठी मंडळाच्या 'मराठीतील ओळख ज्येष्ठ साहित्यिकांची' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मराठी साहित्यविश्वातील अजरामर व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याची आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्यात आली. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी परिचय करून दिला. त्यांच्या लेखनातील विनोद हा केवळ हास्यनिर्मितीसाठी नसून, त्यामागे जीवनाकडे सकारात्मक आणि संवेदनशील दृष्टीने पाहण्याची ताकद आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. जीवनातील विविध प्रसंगांकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले, तर प्रत्येक गोष्टीमध्ये एखादा चांगला पैलू शोधता येतो, असा महत्त्वपूर्ण संदेश डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या साहित्यकृतीतील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावातील विविध छटा कशा प्रभावीपणे टिपल्या आहेत, याचीही विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. साहित्य वाचताना केवळ कथा किंवा व्यक्तिरेखा समजून न घेता, त्या व्यक्तिरेखांमधून मानवी जीवनाचा आणि समाजाचा अभ्यास करण्याची दृष्टी विद्यार्थ्यांनी विकसित करावी, व या निमित्ताने 'व्यक्ती आणि वल्ली' मधील निवडक पात्रांचे अभिवाचन विद्यार्थ्यांनी करावे, तसेच आपल्या आजूबाजूला असणाऱ्या विविध व्यक्तींचे बारकाईने निरीक्षण करून त्यांच्या व्यक्तिमत्वातील वैशिष्ट्यावर आधारित व्यक्ती रेखाटन लेखनातून करावे अशी अपेक्षा व्यक्त करून मार्गदर्शनचा शेवट केला.

डॉ.सुप्रिया पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

धुळे जिल्ह्यात १०० शाळांमध्ये मराठी मंडळ स्थापन करण्यासाठी नियोजन बैठक

दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जिल्ह्यातील विविध शाळांमधील ४० पेक्षा अधिक शिक्षक व काही मुख्याध्यापक प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले.

बैठकीत धुळे जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये मराठी मंडळ स्थापन करण्याचा उद्देश, वर्षभर राबविण्यात येणारे विविध उपक्रम तसेच शालेय, तालुका व जिल्हास्तरीय कार्यक्रमांचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मराठी मंडळाच्या प्रमुख वैशाली सोनगिरी यांनी मंडळाची भूमिका स्पष्ट करताना विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, आकलनक्षमता वाढविणे, लेखनाची गोडी निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना आत्मविश्वासाने व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा मंडळाचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांना श्रेष्ठ मराठी साहित्यिक, संत साहित्य व आधुनिक साहित्याची ओळख करून देतानाच गद्य-पद्य लेखन, नाट्य, लोकसाहित्य, कथाकथन, अभिवाचन आदी साहित्यिक व कलाप्रकारांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी मराठी मंडळाच्या नियोजित कार्यक्रमांबरोबरच मराठी व्याकरण व शुद्धलेखन कार्यशाळा घेण्याचेही ठरविण्यात आले.

तसेच बैठकीत जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या आयोजनाबाबत विशेष चर्चा झाली. धुळे जिल्ह्यातील १०० शाळांमधील विद्यार्थ्यांना या संमेलनात सहभागी करून घेण्याचे नियोजन असून, कथाकथन, अभिवाचन, वक्तृत्व, संतसाहित्य, काव्यवाचन आणि परिसंवाद अशा विविध उपक्रमांचा समावेश करण्यात येणार आहे. बाल साहित्य संमेलनासाठी विद्यार्थ्यांची निवड शालेय, तालुका आणि जिल्हास्तर अशा तीन टप्प्यांत करण्यात येईल. त्यात ५०० ते ६०० विद्यार्थी सहभागी होतील याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मराठी मंडळाची ऑनलाईन व प्रत्यक्ष बैठक

व्याख्यान तिसरे : ‘ओळख संतसाहित्याची’ — संतविचारातून जीवनाला दिशा

दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी मराठी मंडळाच्या वतीने डॉ. प्रसाद भंडारी सर यांचे मार्गदर्शक व्याख्यान आयोजित करण्यात आले. ‘ओळख संत साहित्याची’ या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी संत साहित्य हे केवळ भक्तीपर साहित्य नसून, व्यक्ती घडविणारे, समाज घडविणारे आणि राष्ट्रनिर्मितीला दिशा देणारे जीवनसाहित्य आहे, हा विचार विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडला.

संतांचे विचार म्हणजे माणुसकी, शिस्त, सदाचार आणि कर्तव्यनिष्ठा यांचा संदेश आहे. ‘माणुसकी हाच धर्म’ हा विचार संतांच्या आचार-विचारांतून आणि कृतीतून आपल्याला अनुभवायला मिळतो, असे डॉ. भंडारी यांनी सांगितले.

समर्थ रामदास स्वामींच्या ‘मनाचे श्लोकां’ मधून मनाला दिलेला उपदेश आजच्या विद्यार्थ्यांसाठीही तितकाच उपयुक्त आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आजच्या मोबाईल आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ मोबाईलच्या संगतीत न राहता पुस्तकांची संगत धरावी, दररोज काहीतरी नवीन शिकावे, वाचावे आणि लिहावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा संदर्भ देताना त्यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण जगावर प्रेम करण्याची आणि भक्तिमय जीवन जगण्याची प्रेरणा दिली. भक्ती म्हणजे केवळ ईश्वरभक्ती नव्हे; तर देशाविषयीची भक्ती, आपल्या कामाविषयीची निष्ठा, अभ्यासाविषयीची तळमळ आणि आपल्या कर्माप्रती असलेली श्रद्धा यांचाही त्यामध्ये समावेश होतो, असा व्यापक अर्थ त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. ज्ञानाच्या माध्यमातून व्यक्तीने मोठे व्हावे, आपले चारित्र्य स्वच्छ व निर्मळ ठेवावे, निर्व्यसनी जीवन जगावे आणि आपल्या अधिकारांचा योग्य व सकारात्मक वापर करावा, असा संदेश संत साहित्य आपल्याला देते, असे डॉ. भंडारी यांनी नमूद केले.

४१ शाळांचा जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या शालेयस्तरीय फेरीत उत्स्फूर्त सहभाग

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विहार अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या अनुषंगाने दि. १६ ते २२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत शालेयस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात एकूण ४१ शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विविध शाळांमध्ये काव्यवाचन, अभिवाचन, कथाकथन आणि परिसंवाद या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक कलागुणांना वाव देण्याची, अभिव्यक्ती कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. शालेयस्तरीय स्पर्धांमधील सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रत्येक शाळेतील प्रत्येक स्पर्धेसाठी तीन विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली. तसेच शालेय स्तरावर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध झाले.

धुळे तालुक्यातील शाळास्तरीय सहभागी विद्यार्थ्यांची क्षणचित्रे

शिंदखेडा तालुक्यातील शाळास्तरीय सहभागी विद्यार्थ्यांची क्षणचित्रे

शिरपूर तालुक्यातील शाळास्तरीय सहभागी विद्यार्थ्यांची क्षणचित्रे

साक्री तालुक्यातील शाळास्तरीय सहभागी विद्यार्थ्यांची क्षणचित्रे

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या तालुकास्तरीय स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

साक्री तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलनात ५३ विद्यार्थ्यांचा सहभाग. २३ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा, साक्री, शिरपूर आणि धुळे या चारही तालुक्यांत तालुकास्तरीय बालसाहित्य काव्यवाचन, अभिवाचन, कथाकथन व परिसंवाद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

साक्री तालुक्यातील स्पर्धा दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी न्यू इंग्लिश स्कूल, साक्री येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत ९ शाळांमधील ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी गटशिक्षणाधिकारी मा. कविता मेखे आणि शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रमोद बेडसे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले. सर्व सहभागी शाळांचे शिक्षक प्रतिनिधीही उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी केले.

साक्री तालुकास्तरीय स्पर्धेचे क्षणचित्रे

शिंदखेडा तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलनात ६७ विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या अनुषंगाने दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा येथील हस्ती भवन येथे तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पाच शाळांमधील एकूण ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सहभागी शाळांचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धांचे परीक्षण प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी केले. विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी या संमेलनाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले.

शिंदखेडा तालुकास्तरीय स्पर्धेचे क्षणचित्रे

शिरपूर तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलनात ३८ विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या अनुषंगाने दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी के. व्ही. टी. आर. सी. बी. एस. सी. इंग्लिश स्कूल, शिरपूर येथे तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पाच शाळांमधील ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा मिस्त्री आणि शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धांचे परीक्षण प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी केले. या संमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

शिरपूर तालुकास्तरीय स्पर्धेचे क्षणचित्रे

धुळे तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलनात ८७ विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या अनुषंगाने दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी का. स. वाणी संस्था, धुळे येथे तालुकास्तरीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत १५ शाळांमधील ८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. शोभा शिंदे उपस्थित होत्या. स्पर्धांचे परीक्षण प्रा. प्रभा बैकर आणि प्रसाद पुराणिक यांनी केले. या संमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

धुळे तालुकास्तरीय स्पर्धेचे क्षणचित्रे

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलन उत्साहात पार पडले

विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलन उत्साहात पार पडले. संमेलनानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीची सुरुवात अध्यक्ष सी.ए. श्री. शशिकांत धामणे यांच्या हस्ते उद्घाटनाचा ध्वज दाखवून करण्यात आली. यावेळी श्री. युवराज माने, संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे आणि कल्पना धामणे उपस्थित होते.

ग्रंथदिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी डोक्यावर बालसाहित्य, विविध साहित्यप्रकार तसेच संतसाहित्याचे ग्रंथ घेतले होते. “ग्रंथ आमचे गुरू, वाचनाने प्रगती करू” तसेच “ग्रंथ आमचे सखा-सोबती, वैचारिक जीवनाला देतील गती” अशा घोषणांनी परिसर उत्साहमय झाला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ग्रंथदिंडी उत्साहात पार पडली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला गेला.

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाचे द्वीपप्रज्वलनाने उद्‌घाटन : मा. सचिव महाराष्ट्र शासन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले

धुळे : महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार अंतर्गत मराठी भाषा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हिरे भवन येथे जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. संमेलनाचे उद्‌घाटन मा.सचिव मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शशिकांत धामणे, तर स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे, उपजिल्हाधिकारी शरद पवार, लेखक युवराज माने, विश्वस्त जितेंद्र सोनगिरे, बालसाहित्यिक प्रभाकर पुराणिक, प्रभा बैकर यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्‌घाटनपर भाषणात डॉ. कुलकर्णी यांनी गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. शशिकांत धामणे यांनी मराठी साहित्यिकांच्या योगदानाचा उल्लेख करत वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, असे सांगितले. डॉ. के. बी. पाटील यांनी वाचनाची सवय आयुष्य समृद्ध करते, असे नमूद केले. लेखक युवराज माने यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून पुस्तकांशी मैत्री करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. वैशाली सोनगिरे यांनी केले, तर प्रा. डॉ. शोभा शिंदे यांनी आभार मानले.

डॉ. कुलकर्णी व मान्यवर उद्‌घाटन करतांना मा.युवराज माने विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात ‘पालक-बालक संवादातून समृद्ध प्रतिभेचा प्रवास’

धुळे : जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात ‘पालक-बालक संवादातून समृद्ध प्रतिभेचा प्रवास’ या विषयावर डॉ. किरण कुलकर्णी, मा. राजश्री कुलकर्णी आणि मा. श्वेता कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली. ही मुलाखत सौ. वैशाली सोनगिरे यांनी घेतली.

पालक आणि बालक यांच्यातील योग्य संवाद, परस्पर समज आणि प्रोत्साहन यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो व त्यांच्या प्रतिभेचा विकास साधता येतो, हा विचार या मुलाखतीतून मांडण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, पालकांनी मुलांच्या आवडी-निवडी समजून घ्याव्यात आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन द्यावे, हा या मुलाखतीचा मुख्य उद्देश होता. या संवादातून पालक-बालक नात्यातील संवादाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी मुलाखतीत मार्गदर्शन करतांना

तिसऱ्या सत्रात साहित्यिक स्पर्धा; विद्यार्थ्यांचा गुणगौरव

जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन, अभिवाचन, कथाकथन आणि परिसंवाद या साहित्यिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण डॉ. आशिष पानट, अभिवाचन स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सुषमा दाते, कथाकथन स्पर्धेचे परीक्षण मा. रेखा मुदंडा, तर परिसंवाद स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी केले. सर्व परीक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या साहित्यिक आणि सर्जनशील कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

यावेळी उपस्थित मान्यवर व परीक्षकांच्या हस्ते तालुकास्तरीय स्पर्धांमधून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

पर्यावरणपूरक समितीतर्फे शाडू मातीच्या गणपती मूर्ती बनविण्याची कार्यशाळा संपन्न

पर्यावरणपूरक समितीच्या अंतर्गत दरवर्षीप्रमाणे यंदाही शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा दिनांक ६ सप्टेंबर २०२६ व १० सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तीऐवजी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर केल्याने पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत होते, तसेच नैसर्गिक रंग वापरून जलप्रदूषण कमी करण्यास हातभार लागतो, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ३० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच दिनांक 11 सप्टेंबर 2026 रोजी डॉ. जगन्नाथ वाणी (केले) माध्यमिक विद्यालय धुळे येथे गणपती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये देखील 40 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सौ. वैशाली सोनगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पनेतून व कौशल्याने सुंदर व आकर्षक गणपती मूर्ती तयार केल्या व प्रत्येकाने स्वतः बनविलेल्या मूर्तीची स्थापना केली.

रेऊ वाणी विज्ञान विहारात गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न

रेऊ वाणी विज्ञान विहारात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या परीक्षेतून प्रत्येक बॅचसाठी २० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. निवड झालेले विद्यार्थी दर रविवारी विज्ञान विहारात विविध वैज्ञानिक प्रयोग प्रत्यक्ष करून शिकतात.

कार्यक्रमाला कमलाबाई शंकरलाल कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती छाया नाईक, जयहिंद हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. दिनेश निकम आणि सिस्टेल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती दिव्या के. एस. उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विज्ञानातील प्रयोगांमुळे वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि निरीक्षण क्षमता विकसित होते, असे सांगितले.

यावेळी पालक व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सन २०२५-२६ व २०२६-२७ या वर्षातील प्रवेश परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

शिकूया हसत-खेळत विज्ञान’ उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रयोगांची गोडी

विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी आणि पाठ्यपुस्तकातील कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजाव्यात, या उद्देशाने ‘शिकूया हसत-खेळत विज्ञान’ या उपक्रमांतर्गत धुळे येथील १० आणि अमळनेर येथील ५ शाळांमध्ये हा उपक्रम सुरु आहे या उपक्रम अंतर्गत दर महिन्याला अभ्यासक्रमातच्या दोन संकल्पना विद्यार्थ्यांना वेगवगळे प्रयोग करून समजावून सांगण्यात येतात. वर्षभर राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान अभ्यासक्रमातील विविध संकल्पना घरगुती साहित्याचा वापर करून प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगण्यात येनार आहे.

शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल अमळनेर येथे मार्गदर्शन करतांना

‘पाठ्यपुस्तकातील विज्ञानावर आधारित प्रयोग’ उपक्रम उत्साहात

अमळनेर : विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी आणि पाठ्यपुस्तकातील कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजाव्यात, या उद्देशाने का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार, धुळे यांच्या वतीने विशेष उपक्रम राबविण्यात आला. दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल आणि जी. एस. हायस्कूल, अमळनेर येथे इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘पाठ्यपुस्तकातील विज्ञानावर आधारित प्रयोग’ हे विशेष सत्र उत्साहात पार पडले.

या सत्रात मार्गदर्शक सौ. वैशाली सोनगिरे यांनी विविध विज्ञान सिद्धांतांची प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांना सोप्या आणि रंजक पद्धतीने मार्गदर्शन केले.हवा समजून घेतांना या सदरांतर्गत हवेचा जॅक, वॉटर स्प्रिंकलर, लूप ग्लायडर व विमानाचे उड्डाण आणि हेअर ड्रायरच्या साहाय्याने हवेत तरंगणारा चेंडू अशा प्रयोगांतून हवेचा व पाण्याचा दाब, हवेचा प्रवाह आणि त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे स्पष्ट करण्यात आली.

यावेळी विद्यार्थिनी खुशबू बैसाने हिने घरात सहज उपलब्ध असलेल्या टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या मॉडेल्सच्या माध्यमातून ‘अपकेंद्री बल’ (Centrifugal Force) आणि ‘अभिकेंद्री बल’ (Centripetal Force) या संकल्पना प्रात्यक्षिकांसह सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रयोगांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. पुस्तकांमध्ये वाचलेल्या वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगांतून अनुभवायला मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे हे सत्र संवादात्मक आणि ज्ञानवर्धक ठरले. या उपक्रमातून कृतीच्या माध्यमातून विज्ञान शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग जी. एस. हायस्कूल, अमळनेर येथे विद्यार्थी प्रत्यक्ष कृती करतांना

रेऊ वाणी विज्ञान विहारतर्फे अमळनेर येथे विज्ञान मार्गदर्शन कार्यशाळा

अमळनेर :शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी अमळनेर येथील भगिनी मंडळाच्या आदर्श प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेत सौ. डॉ. दिपाली महाजन यांनी ‘वनस्पतींचे भाग व त्यांचे कार्य’ या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच वैष्णवी राजपूत हिने LED सर्किट तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवून विद्युत परिपथाची कार्यपद्धती समजावून सांगितली. फायबर लाइटच्या प्रयोगातून प्रकाशाच्या वहनाची संकल्पनाही स्पष्ट करण्यात आली.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकवृंदाने या उपक्रमाचे कौतुक केले. प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विज्ञान शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना या कार्यशाळेतून मिळाली.

‘शिकूया विज्ञान हसत खेळत’ उपक्रमांतर्ग भगिनी मंडळाच्या आदर्श प्राथमिक शाळेत प्रात्यक्षिक करून दाखवतांना

अमळनेर :शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी अमळनेर येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल व साने गुरुजी हायस्कूल येथे इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध संकल्पना सोप्या व रंजक पद्धतीने प्रयोगांद्वारे समजावून सांगण्यात आल्या.

शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल अमळनेर येथे मार्गदर्शन करतांना

डॉ. सौ. दिपाली महाजन यांनी हृदयाची रचना व कार्ये साध्या आकृती आणि मॉडेलच्या साहाय्याने समजावून सांगितली. तसेच स्टेथोस्कोपद्वारे विद्यार्थ्यांना हृदयाचे ठोके ऐकविले. वैष्णवी राजपूत हिने फायर अलार्म सिस्टीम, ऑटो डान्सिंग रोबोट, विद्युत सुवाहक व दुर्वाहक तसेच सिरीज आणि पॅरेलल LED जोडणी या संकल्पना प्रात्यक्षिकांसह सोप्या भाषेत स्पष्ट केल्या.

या शाळेतही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व शोधकवृत्ती विकसित करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे सांगत मुख्याध्यापक व शिक्षकवृंदाने संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

शिकूया विज्ञान हसत खेळत उपक्रमांतर्ग साने गुरुजी हायस्कूल अमळनेर येथे मार्गदर्शन करतांना

बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

जुलै ते सप्टेंबर या कालावधीत शिनखेळा व शिरपूर तालुक्यातील वीस गावातील 46 शाळा व धुळे तालुक्यातील सहा गावातील नऊ शाळा अशा एकूण 55 शाळेत 16843 विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली तपासणी दरम्यान एकूण 658 विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालय धुळे येथे रेफर करण्यात आले रेफर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी पंधरा विद्यार्थी शारदा नेत्रालय येथे येऊन गेले त्यापैकी दहा विद्यार्थ्यांना चष्मा नंबर काढून देण्यात आला, एक विद्यार्थी हायर सेंटरला रेफर करण्यात आला व एका विद्यार्थ्याला मोतीबिंदूची शस्त्रक्रिया सुचवण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांचा फॉलोअप घेतला असता 6विद्यार्थ्यांनी इतर नेत्रालयात तपासणी केली असल्याचे सांगितले.

विविध शाळांमधील नेत्रतपासणी करताना टीम

गरजू विद्यार्थीनीना सॅनिटरी नॅपकिन चे वाटप

विद्यार्थिनींच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने गरजू मुलींसाठी तळमळ असणाऱ्या कॅनडा स्थित विजया अग्रवाल यांनी पाठवलेल्या सॅनिटरी नॅपकिन चे धुळे तालुक्यातील मोराणे व शिरपूर तालुक्यातील रोहिणी येथील आश्रम शाळेतील विद्यार्थिनींना वाटप करण्यात आले.

मोराणे येथील गरजू विद्यार्थ्यांना व यांचे वाटप

शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी नेहमीच तत्पर असणाऱ्या कॅनडा स्थित माननीय श्री रमेश जी अग्रवाल हे नेहमीच शैक्षणिक वस्तूंचे वाटप करीत असतात.यावेळीही त्यांनी पाठविलेल्या वह्यांचे वाटप मोराणे येथील आश्रम शाळेत करण्यात आले.

स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था, पुणे

१० जुलै : स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशनतर्फे दिवंगत श्री. आनंद गोडसे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'साथी दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमात उज्वल केले आणि अमृत कुमार बक्षी यांनी श्री. आनंद गोडसे यांच्या योगदानाचे स्मरण केले. स्मिथ फाउंडेशन, एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, परिवर्तन ट्रस्ट आणि प्राजित सेल्फ हेल्प ग्रुपच्या प्रतिनिधी व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी आपले अनुभव कथन केले. प्रमुख पाहुणे डॉ. उल्हास लुकतुके यांनी सपोर्ट ग्रुपचे महत्त्व विशद केले.

२९ जुलै : स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन (SAA) येथे शुभार्थींनी कर्मचारी आणि स्वयंसेवकांना वृक्षरोपांचे वाटप करून गुरुपौर्णिमा साजरी केली.

६ ऑगस्ट : स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशनतर्फे एरवाडी दुर्घटनेतील मृतांच्या स्मरणार्थ एरवाडी दिन पाळण्यात आला. यावेळी मेणबत्त्या प्रज्वलित करून दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

२१ ऑगस्ट : DES पुणे विद्यापीठातील मानसशास्त्र विषयाच्या एम.ए.च्या ४५ विद्यार्थ्यांनी एका प्राध्यापकांसह SAA ला अभ्यासभेट दिली

१ सप्टेंबर : SAA येथे 'Beyond the Horizon – A Ride for Resilience' या उपक्रमांतर्गत सेहर हाश्मी यांचे मानसिक आरोग्यविषयक मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले. त्यांनी स्वतःचा मानसिक आरोग्यविषयक प्रवास अनुभवकथनातून मांडत मानसिक आरोग्याबाबतचा कलंक दूर करण्याचा आणि आशा, धैर्य व जिद्दीचा संदेश दिला.

४ सप्टेंबर : SAA येथे शुभार्थींनी दहीहंडी आणि गोपाळकाला आयोजित करून गोकुळाष्टमी उत्साहात साजरी केली.

१० सप्टेंबर : संस्थापक डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशनतर्फे प्रमुख पाहुणे डॉ. अजित भिडे यांच्या उपस्थितीत 'फॅमिली केअरगिव्हर्स डे' आयोजित करण्यात आला. यावेळी मानसिक आरोग्य सेवा कायदा २०१७, मानसिक आरोग्य क्षेत्रातील विविध घटकांमधील समन्वय, तज्ज्ञ व काळजीवाहक यांच्यातील संवाद, औषधोपचारांचे पालन, काळजीवाहकांचा ताण आणि पुनर्वसन या विषयांवर चर्चा झाली. तसेच काळजीवाहकांनी व आजारातून सावरणाऱ्या व्यक्तींनी आपले अनुभव कथन केले.

शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

SHARDA NETRALAY, DHULE
(Unit of Sundeep Foundation, Mumbai)
PERFORMANCE SUMMARY - July - 2026 To September - 2026

A	Outpatient Visits		B	Free/Outreach/Paid	
1	Walk-in Free & Paid	20,382	1	Free & Paid (Including Outreach & Subsidised)	966
2	Vision Center - Chalisgon	1,702	2	Sub-speciality (surgeries/lasers/injections)	2,701
3	Outreach (Screening eye camps)	3,396		Total (Free, Outreach and Paid)	**3,667**
	Total (walk-in+Vision Center+outreach)	**25,480**			

का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे
विद्यमान विश्वस्तांची यादी

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)
मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)
मा. डॉ.के.बी. पाटील
मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी
मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन
मा. श्री. श्रीपाल मुणोत
मा. श्री. विवेक केले
मा. श्री. जितेंद्र सोनगिरे

We accept donations from well-wishers

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K
80G Reg. No. AAATK9380K26PN01

Contact: K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org
(Donations made under Section 80G are eligible for tax exemption)

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
विद्यमान विश्वस्तांची यादी

संस्थापक : स्व. डॉ.जगन्नाथ काशिनाथ वाणी
डॉ. श्री. के. बी. पाटील (अध्यक्ष)
प्रा. डॉ. शोभा प. शिंदे (सचिव)
सीए. श्री. शशिकांत एस. धामणे
प्रा. डॉ. श्री. एन.एम.जैन
श्री. श्रीपाल तेजराज मुणोत
श्री. विवेक राघुनाथ केले
प्रा. डॉ. वंदना महाजन (संचालिका)